# वस्तू व सेवा कर विभाग
# महाराष्ट्र शासन

## दरपत्रक सादर करण्याबाबत सूचना

वस्तू व सेवा कर विभागाच्या माझगांव, मुंबई येथे बसविण्यात आलेली दूरध्वनी यंत्रे व संबंधीत केबलींग, एमडीएफ व विस्तारीत दूरध्वनी यंत्र (सुट्या भागांसहीत) यांच्या सुस्थितीत ठेवण्यासंबंधीचा देखभाल व दुरुस्तीसाठीचा सेवा संविदा करार दिनांक ०१/०४/२०२५ ते दिनांक ३१/०३/२०२६ या एका वर्षाच्या कालावधीसाठी दर पत्रक मागविण्यात येत आहेत.

दूरध्वनी यंत्रे व संबंधीत केबलींग, एमडीएफ व विस्तारीत दूरध्वनी यंत्र (सुट्या भागांसहीत) यांच्या सुस्थितीत ठेवण्यासंबंधी देखभाल व दुरुस्तीसाठीच्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन दरपत्रक सादर करावे. सदरच्या अटी व शर्ती https://mahagst.gov.in/ या शासनमान्य संकेतस्थळावरुन डाऊनलोड करता येतील.

| | |
|---|---|
| दरपत्रक सादर करण्याचा अंतिम दिनांक :- | १८/०३/२०२५ सायं. ५.०० वाजेपर्यंत. |
| दरपत्रक सादर करण्याचा पत्ता :- | राज्यकर उपायुक्त (जनसंपर्क) कार्यालय, वस्तु व सेवा कर भवन, ई-विंग, पहिला मजला, माझगांव, मुंबई – 400010. |
| दरपत्रक उघडण्याचा दि. :- | १९/०३/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता. (शक्य झाल्यास). |

कोणतेही कारण न देता कोणतेही दरपत्रक अथवा सर्व दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. राज्यकर उपायुक्त (जनसंपर्क), मुंबई यांच्याकडे राखीव ठेवण्यात येत आहेत.

सही/-
जनार्दन आटपाडकर
राज्यकर उपायुक्त (जनसंपर्क)
मुंबई.

# दुरध्वनी यंत्रे, विस्तार क्रमांक यांचे वायरिंग, केबलिंग यांच्या देखभाल/दुरुस्तीसाठी अटी व शर्ती:

दुरध्वनी संचाच्या दुरुस्तीचे कंत्राट **दि. ०१/०४/२०२५ ते दि. ३१/०३/२०२६** या कालावधीकरिता असेल.

१. कंत्राटदाराच्या कार्यक्षमतेत जुनी व नवीन इमारत बेसमेंट ते १० वा मजला येथील :-
अ. सर्व जंक्शन बॉक्सेस
ब. मेन जंक्शन बॉक्स ते लहान जंक्शन बॉक्सपर्यंतची वायरिंग
क. लहान जंक्शन बॉक्स ते दुरध्वनी संचापर्यंतची वायरिंग
ड. सर्व मजल्यांवर आवश्यकतेप्रमाणे वेगवेगळ्या ठिकाणी दुरध्वनी क्रमांक देणे, कनेक्शन करुन/ बदलुन देणे इ. बाबींचा समावेश असेल. त्या कामासाठी एक कायमस्वरुपी तंत्रज्ञ वस्तू व सेवा कर भवन, माझगाव या कार्यालयात ठेवणे आवश्यक आहे.

२. वस्तू व सेवा कर भवन, माझंगाव इमारतीत आज सद्यस्थितीत १२०० दुरध्वनी संच व विस्तार जोडण्या कार्यरत असुन भविष्यात त्यात ५० टक्के पर्यंत वाढ अपेक्षित आहे. अशी वाढ झाल्यास त्याची दुरुस्ती व निगा कंत्राटदाराला त्याच किंमतीत करावी लागेल. त्यासाठी कोणतीही अतिरिक्त मोबदला कंत्राट कालावधीत मिळणार नाही.

३. दुरध्वनी यंत्राच्या वार्षिक देखभाल/ दुरुस्तीसाठी मे. ______________________________ यांना वार्षिक रू. ____________/- (अक्षरी रू. __________________________________________फक्त) इतका मोबदला देण्यात येईल. मिळणाऱ्या मोबदल्यातून आयकर कायद्यानुसार टीडीएस व अधिभाराची तसेच लागु असल्यास सेवा कराची रक्कम कपात करण्यात येईल. सदर मोबदला त्रैमासिक पद्धतीने समान चार हफ्त्यांमध्ये देण्यात येईल व रू. ________/- (अक्षरी रूपये ______________________________फक्त) एवढी रक्कम प्रत्येक तिमाहीअंती अदा करण्यात येईल.

४. वरील बाबींसाठी लागणारे केबलींग / वायरिंग, विस्तारित दुरध्वनी यंत्र (सध्या १२०० संच) यांची नियमित देखभाल करणे आवश्यक राहील. तसेच देखभालीसाठी वापरली जाणारी केबल व इतर सामग्री नवीन व उत्तम दर्जाचे असणे आवश्यक आहे.

५. सर्व सामुग्री अद्यावत तसेच ISI प्रमाणित कंपन्याची असणे आवश्यक आहे. या सर्व वस्तुंची खरेदी कंत्राटदार स्वतः करील. त्यांचा कोणताही परतावा या विभागाकडून मिळणार नाही.

६. दुरध्वनी यंत्रे सुस्थितीत ठेवण्याकरिता सिलिका जेल, स्प्रे (Moisture spray) चा वापर कमीत कमी ३ महिन्यातून एकदा करुन यंत्रे स्वच्छ ठेवण्यात यावीत व त्याचा अहवाल या कार्यालयात नियमितपणे सादर करण्यात यावा.

७. देखभालीच्या कामात विस्तारित दुरध्वनी आवश्यकतेनुसार स्थानांतरण करणे, इमारतीचे दुरुस्ती काम चालु असल्यामुळे विस्तारित दुरध्वनी स्थानांतरण करणे व प्रसंगी नविन विस्तारित दुरध्वनी लावणे या कामांचा समावेश असेल. देखभालीचे काम हुशार, निष्णात व अनुभवी तंत्रज्ञाकडुन करणे आवश्यक आहे.

८. कंत्राट घेण्यापुर्वी कंत्राटदाराने सर्व विस्तारित क्रमांक व त्यांची केबलिंग व वायरिंग इत्यादींची पाहणी करुन अत्यंत खराब किंवा दुरुस्तीस अपात्र वायरिंग किंवा केबलिंगची यादी बनवावी व तसे या विभागास निदर्शनास आणावे. (त्याचा खर्च शक्यतो निविदेत एकत्रित दाखवावा.)

९. देखभालीच्या कंत्राट कालावधीमध्ये देखभालीचे काम असमाधानकारक वाटल्यास कंत्राटदाराचा करार कुठल्याही वेळी रद्द करण्यात येईल व देखभालीचे काम खंडीत करण्यात येईल. त्याबाबत कुठलाही मोबदला त्यांना मिळणार नाही. तसेच अनामत रक्कम जप्त करण्याचे अधिकार वस्तू व सेवा कर विभागास असतील.

१०. तक्रारीचे निवारण २४ तासात न झाल्यास पहिल्या दिवशी रु. १००/- दंड आकारला जाईल व त्यानंतर प्रतिदिन रु. २००/- दंड आकारला जाईल.

११. करार रकमेच्या ५ % रक्कम अनामत रक्कम म्हणुन बँक गॅरंटीद्वारे शासनाकडे जमा करावी लागेल व सेवा असमाधानकारक राहिल्यास सदर बँक गॅरंटी जप्त करण्यात येईल.

वरील सर्व अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असुन त्या मला मंजुर आहेत.

|                                   |                                                |
|-----------------------------------|------------------------------------------------|
| ________________, मुंबई यांच्या वतीने | वस्तू व सेवा कर विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने |
| **प्रोप्रायटर** | **राज्यकर अधिकारी (जनसंपर्क), मुंबई** |
| साक्षीदार १:- | साक्षीदार २:- |
| सही - | सही - |
| नाव - | नाव - |
| पत्ता - | पत्ता - |